# युद्धकैदींच्या संदर्भात मानवाधिकाराची भूमिका

**डॉ. माधुरी नितिन देवतळे**
यशवंतराव गुडधे पाटील स्मृती कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, नागपुर

---

जॉन लॉक यांच्यानुसार,“व्यक्तिला त्याच्या व्यक्तिमत्वात निसर्गत:च मूलभूत मानवाधिकार मिळालेले असतात”[1] तर महान विचारवंत रुसो म्हणतो, “मनुष्य हा जन्मत: स्वतंत्र असतो मात्र तो नंतर शृंखलाबध्द बंधनात अडकत जातो”[2] रुसोच्या या विधानातून शोषण व असमानतेच्या बंधनात अडकलेल्या सामान्य व्यक्तीला समानतेचे श्रेष्ठ जीवन प्राप्त करण्याच्या अधिकाराची अपेक्षा व्यक्त केली आहे. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. त्याला आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी इतरांचा आधार घ्यावा लागतो. परिणामता व्यक्ती, कुटुंब व समाज यातून राज्याची निर्मिती झाली. या राज्याने राज्यातील प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या इच्छेनुसार जीवन जगण्याचे व विकास करण्याचे स्वातंत्र्य आणि संधी द्यायला हवी सोबतच नागरिकांच्या स्वातंत्र्य रक्षणाची जबाबदारी ही स्वीकारली पाहिजे या कल्पनेतून मानवी अधिकाराची संकल्पना उदयास आली. जगात सर्वत्र विविध सभा, बैठका, सम्मेलने होऊन व्यक्तीला त्यांचे अधिकार म्हणजेच मानवाधिकार बहाल करण्यात आले. सहाजिकच या अधिकारांचे रक्षण करण्याची जबाबदारी राज्याकडे आली. राज्यानेही व्यक्तीच्या अधिकार रक्षणाबरोबरच त्यांच्या स्वातंत्र्याच्या रक्षणाचीही जबाबदारी स्वीकारली. हे स्वातंत्र्य अबाधित राखण्याच्या प्रयत्नातून व अतिरेकी राष्ट्रवादातून युद्धे घडून आली. युद्धामध्ये स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विध्वंसकता, विनाश, हिंसा घडून आल्यात. परिणामी मानवी अधिकारांचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन झाले. युद्धानंतर विजेत्या राष्ट्राने पराभूत राष्ट्राचे पकडलेले युद्धकैदी यांच्या हक्काचे पूर्णत: हनन झाले. त्यासाठी जगात विविध पातळीवर विचारमंथन होऊन युद्धकैद्यांना त्यांचे मानवी हक्क बहाल करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले. अंतिमतः मानवतेच्या दृष्टीकोणातून ‘मानवाधिकार व युद्धकैदी’ यांची योग्य सांगड घातली गेली.

**मानवाधिकार संकल्पनेचा उदय – विकास -**

मानवी हक्क संकल्पना फार प्राचीन आहे. ही ग्रीक, रोमन व ख्रिस्ती तत्वज्ञानात, हयुगो, ग्रोशिअस, मिल्टन या विचारवंताच्या साहित्यात आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीत या संकल्पनेचा उदय झालेला आपल्याला दिसून येतो. आर. जे. विन्सेट यांच्या मते, “मानवी अधिकार असे आहेत जे प्रत्येक व्यक्तिला मनुष्य असल्यामुळे निसर्गत: प्राप्त होतात. याचा मूळ स्त्रोत मानवी स्वभावातच अंतर्गत आहे.”[3] डेव्हिड सेलबाई यांच्या मते, “मानवी अधिकार विश्वातील सर्वच व्यक्तींना प्राप्त आहेत कारण ते मुलत: मानवीय आहेत. ते निर्माण केले जात नाहीत, विकत घेता येत नाहीत किवा कुठल्याही प्रकारच्या संसदीय कायदे प्रक्रियेपासून ते मुक्त असतात.”[4]

एकंदरीत मानवप्राणी म्हणून जगण्याचे जे हक्क आहेत व त्याचा सर्वांगीण विकास करण्याचे जे हक्क आहेत ते यात समाविष्ट आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि राष्ट्रीय एकात्मता हे भारतीय राज्यघटनेचे मूलतत्व आहे. स्वतंत्र राज्यघटना स्वीकारून भारतातील सर्व व्यक्ति समान असतील असे स्पष्ट केले. भारतीय राज्यघटनेने नागरिकांना कलाम १४ ते ३५ च्या दरम्यान विविध हक्क दिले आहेत. ‘व्यक्ती तितक्या प्रवृत्ती’ या न्यायाने देशात वर्गभेद, वर्णभेद, भाषा, प्रादेशिकता, धर्म व पंथ यामुळे कोणताही संघर्ष होऊ नये यासाठी केंद्र

सरकारद्वारे मानवी हक्क आयोगाची १२ ऑक्टोबर १९९३ रोजी स्थापना करण्यात आली. तसेच कायद्यातील तरतुदींनुसार राज्य पातळीवर 'राज्य मानवाधिकार आयोग' इ. स. २००० मध्ये स्थापन करण्यात आला. या आयोगामुळे भारतीय जनतेच्या मानवाधिकाराचे रक्षण होत आहे.

**युद्धकैदी संकल्पना व ऐतिहासिक पार्श्वभूमी -**

"शत्रू प्रदेशातील युद्धाशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीला अटक केल्यास युद्धबंदी ही संज्ञा लागू पडते."[5] प्राचीन काळात युद्धकैद्याबद्दल निश्चित अशी कोणतीही नियमावली नव्हती. युद्धकैद्यांना गुलाम बनविल्या जात किंवा देवापुढे बळी देत असत किंवा त्यांना सरळ ठार मारल्या जाई.

ग्रेशिअस यांच्या मतानुसार,

"मध्ययुगाच्या शेवटी गुलाम बनविण्याची प्रथा कमी होऊन कैद्याचा महिन्याचा पगार किंवा विशिष्ट रक्कम घेऊन त्यांची सुटका केली जात असे."[6]

१७ व्या शतकात युद्धकैद्यासंदर्भात बदल करण्यात आला. १७८५ मध्ये अमेरिका व प्रशिया या देशांमध्ये एक करार झाला. त्यानुसार काही ठराविक बाबी ठरविण्यात आल्या. त्या पुढीलप्रमाणे १. कैद्यांना गजाच्या बंदिगृहात ठेवण्यात येऊ नये. २. कैद्यांना बेड्या घालू नये. ३. त्यांना त्यांच्या आरोग्यासाठी आरोग्यदायी वातावरणात ठेवावे. ४. कैद्यांच्या व्यायाम व भोजनाची योग्य व्यवस्था करावी.

स्विस नागरिक असलेले जिन हेनरी यांनी १८५९ च्या आस्ट्रिया-इटली युद्धातील कैद्यांची दुर्दशा बघून यासंदर्भात पुस्तक प्रकाशित केले. त्यानंतर व्यापक प्रमाणात युद्धकैदी आणि त्यांच्या विविध अडचनींवर विचार सुरू झाला. इ. स. १९०७ मध्ये युद्धकैद्यांसंदर्भात विचार करण्यासाठी हेग संमेलन आयोजीत करण्यात आले. त्यात युद्धबंदी व त्यांच्या मानवाधिकारावर विचारचिंतन होऊन त्यांना काही अधिकार देण्यात यावे याबाबत निर्णय घेण्यात आले. पहिल्या महायुद्धांनातर युद्धकैद्यांसंदर्भात झालेल्या एका समेंलनात युद्धकैद्यांच्या समस्या लक्षात घेऊन त्यांच्या अधिकारासंदर्भात काही निर्णय घेण्यात आले. १२ ऑगष्ट १९४९ रोजी आयोजित जिनेव्हा समेंलनात युद्धकैद्याबाबत करार करण्यात आला. युद्धकैद्यांना देण्यात येणारी वागणूक, त्यांच्या अधिकारांचे संरक्षण लक्षात घेऊन त्यांच्यासंदर्भात नवीन नियम बनविण्यात आले व त्याला संमेलनात सहभागी सर्व राष्ट्रांनी मान्यता दिली. हे नियम पुढीलप्रमाणे १. युद्धकैद्याची जात, धर्म,वर्ण किंवा जन्म यावरून भेदभाव करण्यात येऊ नये. सर्वांना समान वागणूक देण्यात यावी. २. युद्धकैद्यांना काही मूलभूत अधिकार आहेत ते कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. युद्धकैद्यांना सूडबुद्धीची वागणूक देऊ नये. त्यांचा मानसिक व शारीरिक छळ करता येणार नाही. ३. त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यात येईल. ४. स्त्री कैद्यांना आदराने वागविले जाईल. ५. स्त्री कैद्यांची बंदिगृहात वेगळी व्यवस्था राहील. ५. त्यांना पोषक आहार दिला जाईल. ६. त्यांना अंधारकोठडीत ठेवले जाणार नाही. कैद्यांना बौद्धिक विकासाच्या सोयी पुरविल्या जातील. ७. युद्धकैद्यांना दररोज दुपारला १ तास विश्रांती, दर आठवड्याला एक दिवस पूर्ण रजा, कामाचा पूर्ण मोबदला दिला जाईल.

**निष्कर्ष -**

मानवाच्या अस्तित्वावरच समाजाचे अस्तित्व अवलंबून असल्याने मानवाच्या अधिकारांचे संवर्धन होणे आवश्यक आहे. युद्धामध्ये लढणारा सैनिक हा व्यक्तीगत हितासाठी संघर्ष करत नाही. तो राष्ट्रासाठी लढत असतो. त्यामुळे त्याला सन्माननीय वागणूक मिळायला हवी. युद्धकैदी हा पण एक मानव आहे त्यालाही

मानवाधिकार आहेत. कोणताही देश किवा राज्य त्यांचा हा अधिकार हिरावून घेऊ शकत नाही. परंतु अनेक युद्धामध्ये पकडल्या गेलेल्या युद्धकैद्यांना अमानवीय वागणूक दिल्या जाते. आंतर्राष्ट्रीय कायद्याचे हे एकप्रकारे उल्लंघन आहे. त्यामुळे यासंदर्भात अधिक व्यापक आंतर्राष्ट्रीय कायदे, त्यांचे पालन करण्यासाठी एक स्वतंत्र प्राधिकरण व जाणीव निर्माण करण्याची नितांत आवश्यकता आहे.

**संदर्भसूची -**


- 'शिक्षण संक्रमण', जानेवारी २००९, पृष्ठ क्रं. ४१, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
- कश्यप सुभाष, गुप्त विश्व प्रकाश, 'राजनीति कोश', पृष्ठ क्रं. १७८, हिन्दी माध्यम कार्यान्वय निर्देशालय, दिल्ली विश्वविद्यालय, द्वितीय संस्करण, २००४.
- देवरी पी. डी. विसपुते , बिरासदार, 'भारतीय गणराजयाचे शासन आणि राजकारण' , पृष्ठ क्रं. ५१, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २००४.
- रॉय अरुण, 'भारत का राष्ट्रीय मानवाधिकार आयोग', पृष्ठ क्रं. २८, राधा पब्लिकेशन, दिल्ली, २००२.
- देशपांडे श्रीकांत, 'आंतर्राष्ट्रीय कायदा', पृष्ठ क्रं. २३२, मंगेश प्रकाशन, नागपुर, २००२.
- 'शोधयात्रा', खंड पहिला, ( संपादक प्रा. डॉ. उत्तम हणवते ), पृष्ठ क्रं. ९७, अरुणा प्रकाशन, लातूर, २०१२.